PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2024-25)/ 01 / of 2024**

## परिपत्रक:

**विषय: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत.**

संदर्भ:— १) शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/मवि—१/परिपत्रक/२०२४/२९२६, दिनांक ४ एप्रिल, २०२४.

२) कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक संकीर्ण—१११९/प्र.क्र.११५/१५/समन्वय दिनांक २२ डिसेंबर, २०२४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणी करण्याबरोबरच त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मौलीक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषयांवर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच त्यांच्या कार्याशी संबंधित इतर नाविण्यपूर्ण उपक्रम/कार्यक्रम इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

तरी सोबत जोडलेल्या पत्रानुसार महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या उपक्रमांच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करावा.

Baliram

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

ठिकाण:—मुंबई—४०० ०३२
दिनांक: ५ एप्रिल, २०२४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.**
**Web :** www.dhepune .gov. in **E-Mail :mavi.** dhepune@gov.in
**फोन नं.**020/26122119,26051512,26130627,26124639 **फॅक्स नं.** 020/26111153.

क्र.: उशिसं/मवि-१/परिपत्रक/२०२४/ 2926 दिनांक: .२०२४
- 4 APR 2024

**विषय : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत..**

संदर्भ: शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण ११११/प्र.क्र. ११५/१५/समन्वय, दि. २२.१२.२०१५

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणी करण्याबरोबरच त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टया मौलीक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी व शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषयांवर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच त्यांच्या कार्याशी संबंधित इतर नाविण्यपूर्ण उपक्रम/कार्यक्रम इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

विद्यापीठे/महाविद्यालये यांनी आयोजित केलेल्या उपक्रमांच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करावा.

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/स्वयंअर्थसहायित विद्यापीठे - महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य / संचालक, सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालये/संस्था.

प्रत माहितीस्तव - मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त सर्व शासकीय विभागांनी कार्यक्रम आराखडा तयार करुन, कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-१११९/प्र.क्र.११५/१५/समन्वय**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई - ४०० ०३२.
तारीखः २२ डिसेंबर, २०१५.

परिपत्रक -

राज्य मंत्रिमंडळाच्या दि.२५.८.२०१५ रोजीच्या बैठकीत,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त सर्व शासकीय विभागांनी कार्यक्रम आराखडा तयार करुन कार्यक्रमाचे आयोजन करावे व त्याचा खर्च त्यांच्या उपलब्ध तरतुदीमधून करावा असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सर्व विभागाने कार्यवाही करण्याबाबत मा.मुख्य सचिव यांनी दिनांक २६.०८.२०१५ च्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत.

२. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणीबरोबर त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मौलिक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषतः शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी सन २०१५-२०१६ हे वर्ष महाराष्ट्र शासनाने समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त वर्षभर कोणकोणते कार्यक्रम करावेत यासंदर्भात सूचना देण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार सर्व संबंधितांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.:-

**भाग अ** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाचे ग्रंथ प्रकाशनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना करण्यात आली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती निमित्ताने, त्यांचे ग्रंथ प्रकाशनाचे कार्य गतिमान व्हावे यासाठी सदस्य सचिव, डॉ. बाबासाहेब चरित्र साधने समिती यांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती मार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या १ ते २१ खंडांच्या प्रती सामान्य जनतेला उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) आवश्यकतेनुसार खालील काही निवडक खंडांची अधिक मागणी विचारात घेता, त्यांचे पुनर्मुद्रण करण्यात यावे. :-

| | | |
|---|---|---|
| १ | खंड क्र.१ | कास्ट इन इंडिया अँड अदर्स |
| २ | खंड क्र.५ | एसेज ऑन अनटचेबल्स अँड अनटचेबिलीटी |
| ३ | खंड क्र.७ | हू वेअर शूद्राज ? |
| ४ | खंड क्र.१६ | डॉ. आंबेडकर्स पाली ग्रामर अँड पाली डिक्शनरी |
| ५ | खंड क्र.१७(१) व (२) | मिस्लेनिअस रायटिंग्ज ऑफ डॉ.बाबासाहेब आंबेडकर |
| ६ | खंड क्र. १८(३) | डॉ. आंबेडकरांची भाषणे |

३) सर्व शासकीय /अशासकीय ग्रंथालये / महाविद्यालये या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सर्व ग्रंथ उपलब्ध होतील या दृष्टीने समितीने प्रयत्न करावेत.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंतीदिनी डॉ.बाबासाहेब आबेडकरांच्या चार ते पाच खंडांचे प्रकाशन करण्याची कार्यवाही समितीने करावी.

**भाग ब** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती निमित्ताने सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांनी विविध कार्यक्रम आयोजित करुन, ते विद्यापीठ स्तरावरील कार्यक्रम व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयीन स्तरावरील कार्यक्रम अशाप्रकारे स्वतंत्ररित्या राबवावेत.

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधीत खालील विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात यावे. :-

| | |
|---|---|
| १ | घटनाकार बाबासाहेब |
| २ | संसदपटू बाबासाहेब |
| ३ | शिक्षणतज्ञ बाबासाहेब |
| ४ | नॅशनॅलिस्ट बाबासाहेब |
| ५ | अर्थतज्ञ बाबासाहेब |
| ६ | समाजसुधारक बाबासाहेब |
| ७ | पत्रकार बाबासाहेब |
| ८ | जलतज्ञ बाबासाहेब |
| ९ | क्रांतीकारक बाबासाहेब |
| १० | बाबासाहेबांचे इतर पैलू |

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ग्रंथ संपदा व त्यांच्या विचारधारांवर आधारित पुस्तकांचा ग्रंथोत्सव साजरा करण्यात यावा.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची दुर्मिळ छायाचित्रे, पेंटींग यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात यावे.
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर आधारित एकांकिका, एकपात्री नाटक/ प्रयोग, पथनाट्य आयोजित करण्यात यावे.
५. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विद्याव्यासंग विद्यार्थ्यांना प्रेरणादायी होण्यासाठी सलग १८ तास अभ्यास अभियान राबविण्यात यावे.
६. राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दत्तक घेतलेल्या गावांमध्ये सामाजिक समता व राष्ट्रीय बंधुभाव आदींवर आधारित प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.
७. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भेटी दिलेल्या व त्यांचा संबंध आलेल्या ऐतिहासिक ठिकाणी विद्यापीठ व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजित कराव्यात. ( उदा. महाड, महू, अहमदनगर, दिक्षाभूमी, आंबेवाडी, मुंबई.)
८. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान, विचारधारा, चळवळ, संविधान व त्यांच्या राष्ट्रीय कार्यावर आधारित व्याख्यानमाला, आंतर-महाविद्यालयीन वर्क्तुत्व, वादविवाद स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गीत गायन स्पर्धा इत्यादींचे आयोजन करण्यात यावे.
९. विद्यापीठ /महाविद्यालयीन कार्यक्षेत्रात सामाजिक न्याय, समता, मानवता, दलित वंचिताची सेवा करणाऱ्या निस्वार्थ व सेवाभावी कार्यकर्त्यांची निवड, नामांकित व्यक्ती समावेश असलेली निवड समिती गठित करुन करण्यात यावी. यामध्ये महिलाही असावी. अशा व्यक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नावे पुरस्कार प्रदान करण्यात यावा. त्यामध्ये सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, ग्रंथ भेट देण्यात यावी.
१०. डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रज्ञा शोध परीक्षा (Dr. Babasaheb Ambedkar Talent Search Examination) आयोजित करण्यात यावी.
११. डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा व तत्वज्ञान, पदव्युत्तर /पदविका /प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विद्यापीठ स्तरावर विचार करण्यात यावा.

४. उपरोक्त कार्यक्रमांव्यतिरिक्त विद्यापीठ स्तरावर आयोजित करावयाचे इतर कृति कार्यक्रम विद्यापीठांना आयोजित करता येतील. तसेच संलग्नित महाविद्यालयांना आयोजित करावयाच्या कृति कार्यक्रमाचा आराखडा विद्यापीठाने तयार करुन, संबंधित महाविद्यालयांना पाठवावा व हया कार्यक्रमाचे महाविद्यालय स्तरावर योग्यरित्या प्रभावीपणे अंमलबजावणी होते अथवा नाही याबाबत सर्व विद्यापीठांनी देखरेख करावी. यासाठी होणारा खर्च उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

५. तसेच या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संचालनालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांस्तरावर कार्यक्रम आयोजित करण्याबाबत योग्य त्या सूचना द्याव्यात. तसेच यासंदर्भात होणारा खर्च संबंधितांनी त्यांच्या उपलब्ध तरतुदीमधून भागवावा.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५१२१४१५०७२४१४०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

Digitally signed by Kamini R Pilankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=791d70f75a8bfaa8349786f02d71cad4fb9d1999ea0d92d63dcf5de198d4f817, cn=Kamini R Pilankar
Date: 2015.12.30 17:50:08 +05'30'

(का. रा. पिळणकर)
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक , शासकीय मुद्रण व लेखन सामग्री सेचालनालय, चर्नीरोड, मुंबई.
११. विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, धोबीतलाव, मुंबई.
१२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१३. सदस्य सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समिती, मुंबई.
१४. निवडनस्ती.